# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

## प्रेसनोट

२०२१

गुन्हे शाखा, नवीमुंबई

दिनांक २२.१२.२०२१

**तळोजा पोलीस ठाणे हद्दी मध्ये अंमली पदार्थाची विक्री करणा-या इसमां विरुद्ध गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने केली कारवाई (अंमली पदार्थ विक्रेत्याच्या आवळल्या मुसक्या)**

..........................................................................................................................

दि. २१/१२/२०२१ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्षास, गांजा या अंमली पदार्थाच्या विक्रीबाबत मिळालेल्या बातमीची माहिती वपोनि सय्यद यांनी मा. अपर पोलीस आयुक्त सो. गुन्हे, नवी मुंबई, मा.पोलीस उप आयुक्त सो. गुन्हे शाखा व सहा. पोलीस आयुक्त सो.गुन्हे शाखा यांना दिली असता, त्यांनी सदरची बाब गंभीरपणे घेवुन मार्गदर्शनपर सुचना देवुन वपोनि सय्यद यांना कारवाई करण्यास सांगितले.

त्यानुसार वपोनि सय्यद, पोउपनि शिंगे, पोहवा/५७८ संतोष गायकवाड, पोहवा/१३७७ तायडे, पोहवा/१२०२ कासम पिरजादे, पोहवा/१२५४ दिपक कांबळे, पोहवा/४१८६ राकेश अहिरे, मपोना/२७९४ हेमांगी पाटील, असे मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी पाटील वाडी पाले खुर्द, पोस्ट देवीचा पाडा,ता.पनवेल,जि. रायगड येथे छापा टाकला असता इसम नामे अक्रम हुसेन अब्दुल जलील खान, वय ३२वर्षे ,रा. मु.पो. पाटील वाडी, पाले खुर्द ,पोस्ट देवीचा पाडा, ता. पनवेल, जि. रायगड, मुळ रा. मु.पो. दर्यासिंग दुरारा ,पोस्ट दुरारे ठाणा ता. बस्ती, जि. संत कबीर नगर, राज्य उत्तरप्रदेश हा‘‘**गांजा** ’’ या अंमली पदार्थ विक्री करिता सोबत बाळगलेल्या स्थितीत असताना मिळून आला आरोपी **नामे अक्रम हुसेन अब्दुल जलील खान याचे ताब्यात ५०,४००/- रु किंमतीचा २ किलो ८० ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ मिळुन आल्याने** त्याच्या विरुध्द **तळोजा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर ।। ४१७/२०२१ गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ (एनडीपीएस) अधिनियम १९८५ चे कलम ८(क),२० (ब)**अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला सदर अंमली पदार्थ कोठुन आणला याचा अधिक तपास करित आहोत. सदर गुन्हयाचा तपास पोउपनि शिंगे हे करित आहेत.

———————————————